॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon - 425001

'A' Grade NAAC Reaccredited (3rd Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनी/नै.वि.२०१९-२०/ डी.ओ. 8 / डीटीई प्रवेश / 148 /२०१९ दिनांक : 27-04-2019

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे श्रीमती शरदचंद्रिका सुरेश पाटील कॉलेज ऑफ फार्मसी चोपडा
ता. चोपडा जि. जळगाव

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या मान्यतेबाबत**

संदर्भ :- १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी / नैसर्गिक विस्तारासाठी [Continuation of Affiliation / Natural Growth] सादर केलेला प्रस्ताव

२) विद्यापीठाद्वारे पत्र क्रमांक KBCNMU/05/ Nutani-NG-2019-20/D.O. 8 / 80 / 2019 दि. **26-02-2019** रोजी नियुक्त करण्यांत आलेली स्थानिक चौकशी समिती

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास / नैसर्गिक विस्तारास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात/मान्यताप्राप्त परिसंस्थेसंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समिती नियुक्त करण्यांत आली होती.

सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालाची, प्राप्त आदेशान्वये, मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून सदर अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी मा. विद्यापरीषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

वरील अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस देण्यांत येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष **२०१९-२०** करिता देण्यांत येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील.

आपणांस असेही विदीत करण्यांत येते की, आपल्या महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील ज्या पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता **"No Admission"** असे नमूद केलेले असेल, अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशीत करू नयेत. आपण अशा अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशीत केल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदरची मान्यता AICTE, New Delhi मान्यता पत्राच्या अधिन राहून देण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

**(ग. नी. पवार)**
**उपकुलसचिव**
**संलग्नता विभाग**

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता.

**प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-**

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

२) मा. शिक्षण संचालक,तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - १

३) मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, नविन शासकीय तंत्र निकेतन परिसर, पो.बॉ.क्र.२१९, सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक

४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उ.म.वि., जळगांव

५) मा. संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, कबचौ उ.म.वि., जळगांव

६) मा. उप/सहा. कुलसचिव, संबंधीत विद्याशाखा, परीक्षा विभाग, कबचौ उ.म.वि., जळगांव

७) मा. सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव

८) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव